# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

नगर रचना विभाग

फोन : २३३३५३६-४०, २३४८००१-०५
P.B.X. २३३१२८१, २३३१२८३
Fax (०२४०)- २३३१२१३

जा.क्र./मनपा/नरवि/उसंनर/२०२२/१७५ दि. २५/०१/२०२२

## जाहीर प्रगटन

औरंगाबाद शहरातील सर्व नागरिकांना जाहिररीत्या कळविण्यात येते की, सर्व्हे नंबर १४, मौजे हर्सूल, औरंगाबाद या जमिनीमधून घनकचरा प्रक्रिया प्रकल्पासाठी **श्री. सखाराम तुकाराम भाले व श्री. भिका तुकाराम भाले (मयत) तर्फे श्री. विलास भिकाजी भाले, श्री. संजय भिकाजी भाले, श्री. कैलास भिकाजी भाले, श्री. संदीप लक्ष्मण भाले व श्री. राहुल लक्ष्मण भाले** यांच्या जमिनीतून शासन परिपत्रक क्रमांक एलक्युएन-०१/२०१७/ प्र.क्र.१२/अ-२ मंत्रालय, मुंबई-३२ दिनांक २५ जानेवारी, २०१७ निर्णयानुसार सिंचन व इतर प्रकल्पांसाठी खाजगी क्षेत्रातील जमीन खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पद्धतीने भूसंपादन करावयाचे आहे.

**भूसंपादन करावयाच्या मालमत्तेचे विवरण :**

| | | |
|---|---|---|
| सर्व्हे नंबर / न.भू.क्रमांक | :- | **गट क्रमांक १४/ पैकी मौजे हर्सूल, औरंगाबाद** |
| भूसंपादन करावयाचे क्षेत्र | :- | ७४१३.०० चौ.मी. |
| उत्तर | :- | सर्व्हे नंबर १३ मौजे हर्सूल, औरंगाबाद |
| पूर्व | :- | सर्व्हे नंबर १४/पैकीचा उर्वरित भाग व सर्व्हे नंबर ३४ |
| पश्चिम | :- | सर्व्हे नंबर १४/ पैकीचा उर्वरित भाग |
| दक्षिण | :- | सर्व्हे नंबर १४/पैकीचा उर्वरीत भाग व सर्व्हे नंबर १५ |

सदर जमिनीबाबत या कार्यालयाने शासन परिपत्रक क्रमांक एलक्युएन-०१/२०१७/प्र.क्र.१२/अ-२ मंत्रालय, मुंबई -३२ दिनांक २५ जानेवारी, २०१७ निर्णयानुसार सिंचन व इतर प्रकल्पासाठी खाजगी क्षेत्रातील जमीन खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पद्धतीने भूसंपादन करण्याचे असल्याने कोणत्याही प्रकारचा हितसंबध हक्क असणाऱ्या व्यक्तींचा सदरच्या भूसंपादनास काही आक्षेप उजर/ तक्रार इत्यादी असल्यास तसेच मालकी हक्काचा न्यायालयीन वाद असल्यास / कोणत्याही बँककडे तारण असल्यास सदर प्रकरण प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात उपसंचालक नगररचना विभाग, महानगरपालिका, औरंगाबाद कार्यालयात कागदोपत्री पुराव्यासह सादर करावेत. विहित मुदतीत कुणाचा आक्षेप/उजर/तक्रार प्राप्त न झाल्यास सदरच्या भूसंपादनास कुणाचाही आक्षेप/ उजर नाही असे समजण्यात येऊन सदर प्रकरणात नियमाप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात येईल. तसेच सदर प्रकरणात विहित मुदतीनंतर आलेले आक्षेप/ उजर/तक्रार इत्यादी विचारात घेतले जाणार नाही याची नोंद घ्यावी.

(मा. प्रशासक महोदय यांची मंजूरी दि. ०८/१०/२०२१)

स्वाक्षरित/-
**विशेष भूसंपादन अधिकारी,**
**विशेष घटक, औरंगाबाद**

स्वाक्षरित/-
**उपसंचालक, नगर रचना**
**महानगरपालिका, औरंगाबाद**